सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
पोलीस महासंचालक कार्यालय, महाराष्ट्र राज्य
महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय, शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई ४०० ००१

क्र.पोमसं/३६/र.वका.(८३००)शा.नि.-अधिसूचना/०१/२०२६, मुंबई, दि. ई.स्वाक्षरीत नमुद

**संदर्भ**:- महाराष्ट्र शासन,गृह विभाग, शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-३६२५/प्र.क्र.१०९/ पोल- ३, दि.०७/०१/२०२६

**विषय**:- राज्यात ई-चलान प्रकल्प राबविण्यासाठी सल्लागार म्हणून नियुक्त केलेल्या मे.केपीएमजी कंपनीस दि.१/०२/२०२४ ते दि.३०/०६/२०२४ या कालावधीकरीता केलेल्या कामाचे देयक अदा करणेबाबत.

*****

महाराष्ट्र शासन, गृह विभाग, शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-३६२५/प्र.क्र.१०९/पोल-३, दि.०७/०१/२०२६ ची प्रत महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक सांकेतांक २०२६०१०७१७१२२४८३२९ असा आहे.

२. तरी, सदर शासन निर्णयानुसार कृपया योग्य ती कार्यवाही करण्यात यावी.

Digitally signed by
CHANDRASHEKHAR GOVINDRAO SHINDE
Date: 09-01-2026 17:52:38

( चंद्रशेखर शिंदे )
पोलीस महासंचालक यांचे उपसहायक (र.व.का) (अति.कार्यभार )
पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकरिता.

प्रति,

अपर पोलीस महासंचालक, वाहतूक, महाराष्ट्र राज्य,मुंबई.

प्रत :-

पोलीस उप अधिक्षक, संगणक कक्ष, पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

२. पोलीस उप अधिक्षक, यांना विनंती करण्यात येते की, सदरहू शासन निर्णयाची प्रत या कार्यालयाच्या www.mahapolice.gov.in या संकेतस्थळावर शासन निर्णय/परिपत्रके “सर्वसाधारण" या सदराखाली प्रकाशित करण्यात यावा.

राज्यात ई-चलान प्रकल्प राबविण्यासाठी सल्लागार म्हणून नियुक्त केलेल्या मे. केपीएमजी कंपनीस दि.१.२.२०२४ ते दि.३०.६.२०२४ या कालावधीकरीता केलेल्या कामाचे देयक अदा करणेबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**गृह विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः संकीर्ण -३६२५/प्र.क्र.१०९/ पोल-३**
**मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,**
**मंत्रालय, २ रा मजला, मुंबई- ४०० ०३२.**
**दिनांक : ७.१.२०२६**

**वाचा:**

१. माहिती व तंत्रज्ञान संचालनालय, शासन निर्णय क्रमांक : GAD-मातंस ०८०/४/२०१४-O/O DIRECTORATE OF IT-DIT (MH), दिनांक : ०१.०७.२०१४, दि.२०.०३.२०१८ व दि.०९.०५.२०१९. व दि.२४.४.२०२३ व दि.५.१०.२०२३.
२. शासन निर्णय, गृह विभाग क्रमांक गृहआ-२०१५/प्र.क्र.२३०/आस्थापना-२, दि.२०.०५.२०१५.
३. अपर मुख्य सचिव (गृह) यांच्या अध्यक्षतेखालील प्रकल्प अंमलबजावणी समितीच्या दि.२३.०८.२०१६ रोजीच्या बैठकीचे इतिवृत्त.
४. गृह विभाग, कार्यादेश क्रमांक : टीआरए/१२१३/प्र.क्र.९/शिकाना/पोल-८,दि.०६.०९.२०१६.
५. शासन निर्णय, गृह विभाग क्र.३६१९/प्र.क्र.३६/पोल-३, दि.०७.०८.२०१९. व दि.२१.०९.२०२१. व दि.१८.०८.२०२२ व दि.२१.६.२०२३. व दि.४.१२.२०२३ व दि.२१.३.२०२४.
६. शासन निर्णय, गृह विभाग क्र.३६१९/प्र.क्र.३६/भाग-१/पोल-३,दि.७.२.२०२४.
७. शासन निर्णय, गृह विभाग क्र.३६१९/प्र.क्र.३६/भाग-२/E-७४६७१५/पोल-३,दि.४.२.२०२५.
८. मे.केपीएमजी प्रा.लि. यांचे देयक दि.३.७.२०२४,दि.१८.१०.२०२४,दि.८.५.२०२५ व दि.३०.५.२०२५.
९. अपर पोलीस महासंचालक (वाहतूक) यांचे पत्र क्र. ADGP(Tr.)/४५/Planning/E-Challan/KPMG Bill/२६४४/२०२४,दि.२०.९.२०२४.
१०. अपर पोलीस महासंचालक (वाहतूक) यांचे पत्र क्र. ADGP(Tr.)/४५/Planning/E-Challan/KPMG Bill/३५५२/२०२४,दि.११.१२.२०२४.
११. अपर पोलीस महासंचालक (वाहतूक) यांचे पत्र क्र. ADGP(Tr.)/४५/Planning/E-Challan/KPMG Bill/३३९८/२०२५,दि.८.७.२०२५.
१२. शासन परिपत्रक, वित्त विभाग क्र.अर्थसं-२०२५/प्र.क्र.४४/अर्थ-३, दि.७.४.२०२५
१३. शासन परिपत्रक, वित्त विभाग क्र.अर्थसं-२०२५/प्र.क्र.६५/अर्थ-३, दि.१४.७.२०२५ अनुसार

**प्रस्तावना**

गृह विभागांतर्गत ई-गव्हर्नन्स प्रकल्प राबविण्यासंदर्भात विविध निर्णय घेण्यासाठी गृह विभाग शासन निर्णय दि.२०.०५.२०१५ अन्वये प्रकल्प अंमलबजावणी समिती (PIC) स्थापन करण्यात आली आहे. सदर समितीच्या दि.२३.०८.२०१६ रोजीच्या बैठकीमध्ये मे.केपीएमजी या कंपनीची राज्यात ई-चलान प्रकल्प राबविण्यासाठी प्रकल्प सल्लागार म्हणून नेमणुक करण्यात आली आहे.

राज्यातील वाहनांची संख्या दिवसेंदिवस वाढत असुन त्यामुळे वाहतुक कोंडी व इतर समस्या निर्माण होत आहेत. वाहतुक नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांकडून दंड वसुली दरम्यान वाहतुक पोलीस कर्मचारी/अधिकारी यांना अडचणींना सामोरे जावे लागत आहे. त्यामुळे वाहतुक समस्यांवर अंकूश ठेवणे व कसुरदार व्यक्तींवर प्रभावी तथा पारदर्शकपणे कारवाई करण्यासाठी राज्यामध्ये वन स्टेट वन ई-चलान प्रकल्प जानेवारी २०१९ पासून गृह विभागामार्फत राबविण्यात येत आहे.

शासन पत्र, गृह विभाग क्र.TRA/१२१३/C.R.०९/SHIKANA/POL-८,दि.०६.०९.२०१६ नुसार राज्यात वन स्टेट वन ई-चलान प्रकल्प राबविण्याकरीता मे. केपीएमजी या सल्लागार कंपनीची प्रकल्प सल्लागार म्हणून नेमणूक करण्यात आली. तद्नंतर वेळोवेळी खालीलप्रमाणे कालावधी वाढवून देण्यात आला.

| अ. क्र. | सल्लागारास मुदतवाढ दिल्याच्या शासन निर्णयाचा/ शासन पत्राचा दिनांक | नियुक्त केलेल्या सल्लागाराचा तपशिल (पद व संख्या) | कालावधी |
|---|---|---|---|
| १ | ७.८.२०१९ | १ वरिष्ठ सल्लागार | दि.१०.२.२०१७ ते ३०.९.२०२० |
| २ | २१.९.२०२१ | १ वरिष्ठ सल्लागार<br>१ वरिष्ठ सल्लागार (Quarterly Milestone) | दि.१.१०.२०२० ते ३१.५.२०२१<br>दि.१.६.२०२१ ते ३०.११.२०२१ |
| ३ | १८.८.२०२२ | १ वरिष्ठ सल्लागार | दि.१.१२.२०२२ ते ३१.१२.२०२२ |
| ४ | २१.६.२०२३ | १ वरिष्ठ सल्लागार | दि.१.१.२०२३ ते ३०.६.२०२३ |
| ५ | ४.१२.२०२३ | १ वरिष्ठ सल्लागार<br>२ वरिष्ठ सल्लागार पोलीस महासंचालक वाहतूक यांनी कार्यादेश दिल्याच्या तारखेपासून एक वर्ष नेमणूक करण्यास मान्यता | दि.१.७.२०२३ ते १९.९.२०२३<br>(दि.८.४.२०२४ ते ७.४.२०२५) |
| ६ | २१.३.२०२४ | १ सल्लागार | दि. २०.९.२०२३ ते १९.९.२०२४ |
| ७ | २.६.२०२५ | १ सल्लागार | दि. २०.९.२०२४ ते १९.९.२०२५ |

मे.केपीएमजी कंपनीने राज्यातील ई-चलान प्रकल्पासाठी केलेल्या कामानुसार सदर कंपनीला सल्लागाराची दि.३१.१.२०२४ अखेरपर्यंतची देयके अदा करण्यात आली आहेत, तसा दि. ४.२.२०२५ रोजी शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे.

आता मे.केपीएमजी कंपनीने राज्यातील ई-चलान प्रकल्पासाठी केलेल्या कामानुसार सदर कंपनीला दि.१.२.२०२४ ते दि.३०.६.२०२४ या कालावधीची देयके अदा करण्याची बाब विचाराधीन होती. त्यानुषंगाने शासनाने खालीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

**<u>शासन निर्णय</u>**

ई-चलान प्रकल्पासाठी मे. केपीएमजी कंपनीने दि.१.२.२०२४ ते दि.३०.६.२०२४ या कालावधीसाठी पाहिलेल्या सल्लागारांच्या कामासाठी जीएसटीसह रु.३२,९२,३९७/- (रुपये बत्तीस लाख ब्याण्णव हजार तीनशे सत्याण्णव फक्त्ा) इतक्या रकमेची देयके मे.केपीएमजी कंपनीस अदा करण्यास मंजूरी देण्यात येत आहे. सदर देयकांचा सविस्तर तपशिल खालीलप्रमाणे आहे :-

| No: | Invoice Details | Billing Period | Resource Name and Designation | Man Month Rate as per DIT GR | Deployment (%) | Sub Total | GST (18%) | Total With Taxes |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | KASP-MH/800183 | 1 Feb 2024 – 31 March 2024 | Soumya Swarnaprabha (Consultant) | 3,45,000 | 100 | 6,90,000 | 1,24,200 | 8,14,200 |
| 2 | KASP-MH/800182 | 1 April 2024 to 30 June 2024 | Soumya Swarnaprabha (Consultant) | 3,45,000 | 100 | 10,35,000 | 1,86,300 | 12,21,300 |
| | | 8 April 2024 to 30 June 2024 | Abhjit Aich (Sr. Consultant) | 3,85,000 | 100 | 10,65,167 | 1,91,730 | 12,56,897 |
| **Total** | | | | | | 27,90,167 | 5,02,230 | 32,92,397 |

अ) सदर रकमा या संदर्भात उपरोक्त नमुद शासन निर्णय क्र.१ अन्वये निश्चित केल्यानुसार ई-चलान प्रकल्पासाठी सल्लागारांना दरमहिना दरमाणुस (Man-Month) तत्वानुसार अदा करण्यात येत आहे.

ब) संदर्भ क्र.७ अन्वये मे. केपीएमजी कंपनीने सादर केलेल्या देयकानुसार तसेच अपर पोलीस महासंचालक (वाहतुक), महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या पत्रानुसार सदर रकमा अदा करण्यात येत आहेत. सदर रकमांमध्ये दिनांक दि.१.२.२०२४ ते दि.३०.६.२०२४ या कालावधीसाठी १८% वस्तु व सेवा कर समाविष्ट करण्यात आला आहे.

क) ई-चलान प्रकल्पासाठी संबंधित कंपनीला सल्लागाराच्या मानधनापोटी जादा रक्कम अदा केली आहे, असे निदर्शनास आल्यास सदर जादा रक्कम संबधित कंपनीकडून समायोजीत करण्याचा अधिकार शासनास राहील.

ड) सदर देयके आयकर व इतर प्रचलीत कर वजाती करून अदा करण्यात यावी.

"मागणी क्र.१, २०५५- पोलीस (०१) (०६), ई-चलान प्रकल्प (कार्यक्रम) (२०५५ ए२८४), १३ कार्यालयीन खर्च" या लेखाशीर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा व तो सन २०२५-२६ या वित्तीय वर्षासाठी उपलब्ध असलेल्या अनुदानातून भागविण्यात यावा.

सदर निधी कोषागारातून आहरित करण्यासाठी अपर पोलीस महासंचालक, वाहतूक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना "नियंत्रक अधिकारी" म्हणून घोषित करण्यात यावे. तर त्यांच्या अधिनस्त आहरण व संवितरण अधिकाऱ्याला "आहरण व संवितरण अधिकारी" म्हणून घोषित करण्यात यावे.

सदर शासन निर्णय, वित्त विभाग शासन निर्णय क्र. विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/२०१३/विनियम,दि.१७.०४.२०१५ मधील वित्तीय अधिकार नियम पुस्तिका-१९७८, भाग-पहिला, उपविभाग-चार, मधील अनुक्रमांक ११ अन्वये प्रदान करण्यात आलेल्या वित्तीय अधिकारानुसार तसेच प्रशासकीय विभागाला असलेल्या अधिकारानुसार त्याचप्रमाणे शासन परिपत्रक, वित्त विभाग क्र.अर्थसं-२०२५/प्र.क्र.४४/अर्थ-३, दि.७.४.२०२५ अनुसार तसेच शासन परिपत्रक, वित्त विभाग क्र.अर्थसं-२०२५/प्र.क्र.६५/अर्थ-३, दि.१४.७.२०२५ अनुसार सन २०२५-२६ या आर्थिक वर्षाच्या निधी वितरणाच्या अनुमतीसह अनौपचारिक संदर्भ क्र.३/२०२६, दि.२.१.२०२६ अन्वये मान्यता दिल्यानुसार अनुसार सन २०२४-२५ या आर्थिक वर्षाच्या निधी वितरणास दिलेल्या मान्यतेस अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२६०१०७१७१२२४८३२९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

RAJENDRA TANAJI BHALWANE

Digitally signed by RAJENDRA TANAJI BHALWANE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=HOME DEPARTMENT,
2.5.4.20=38d121bf4a170d16dacf98520f0ac44551976931d2758148ccaa24d1fb27b9df, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=BADFC0DAA40CC485400AAD9CEABCD514095659A6CDFAC856815518DCD188C23A, cn=RAJENDRA TANAJI BHALWANE
Date: 2026.01.07 17:14:38 +05'30'

**(रा.ता.भालवणे)**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

प्रत : माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी.

१. प्रधान महालेखाकार (लेखा परीक्षा)-१, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
२. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
३. अपर पोलीस महासंचालक (वाहतुक), महाराष्ट्र राज्य, मुंबई.
४. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता/लेखा परीक्षा), महाराष्ट्र-१/२, मुंबई/नागपूर.
५. विशेष पोलीस महानिरीक्षक, सायबर, मुंबई.
६. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
७. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
८. सहसंचालक, लेखा व कोषागारे, संगणक कक्ष, नवीन प्रशासकीय भवन, मंत्रालय, मुंबई.
९. कक्ष अधिकारी, व्यय-७ /वित्तीय सुधारणा-१, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
१०. मे. केपीएमजी ॲडव्हायझरी सर्व्हिसेस प्रा.लि., मुंबई.
११. अर्थसंकल्प शाखा, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.
१२. निवड नस्ती / पोल-३.